# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078

Address-sp office Bidco Road,Palghar west

E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र. ५६६ दिनांक ०३.०७.२०२०

## सफाळा पोलीस ठाण्यातील चोरीच्या गुन्हयातील आरोपीतांना तात्काळ अटक

०१/०७/२०२० रोजी सायंकाळी १७.०० वा. ते दिनांक ०२/०७/२०२० रोजी सकाळी ०९.०० चे सुमारास बाबरनगर राजगुरग शाळेच्या बाजुला असलेल्या ठिकाणी सेंटरपार्क रहीवाशी संकुलातील कन्स्ट्रक्शन पुर्ण झालेल्या फिर्यादी भगवतीलाल भैरुलाल जैन यांचे तेजस्वी -ऑटो रिक्षा गॅरेज ॲण्ड स्पेअर पार्टस् नावाचे -ऑटो रिक्षाचे गॅरिजचे बाहेरील पत्र्याचे शेडखाली ठेवलेले १)१८,०००/- रु.किं.चे बॉस कंपनीचे पान्याचे सेट जु.वा.किं.सु. २) ७,०००/- रु.किं.चे गॅरेज वापरातील विविध लुज पाने ३) ३,०००/- रु.किं.चे लहान व मोठे जॅक जु.वा.किं.सु. असा एकुण २८.०००/- रुपये किंमतीचा माल कोणीतरी अज्ञात चोरटयांनी चोरुन नेला होता. त्याबाबत सफाळा पोलीस ठाणे गुरनं ४६/२०२० भा.दं.वि.सं. कलम ३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हा कौशल्यपुर्ण तपासाअंती व मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे तात्काळ उघडकीस आणण्यास सफाळा पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना यश प्राप्त झालेले आहे. सदर गुन्हयात आरोपीत १) सुरज दिलीप बाबर वय २४ वर्षे २) राजेंद्र रमेश पारधी वय ४९ वर्षे दोन्ही रा. बाबरनगर सफाळा ता.जि. पालघर यांना अटक करण्यात आलेली असुन त्यांच्याकडुन गुन्हयात चोरीस गेलेला संपुर्ण माल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही प्रभारी अधिकारी सपोनि/सुनिल जाधव यांचे मार्गदर्शनाखाली पो.उप निरी. पंकज पाटील, पो.हवा/९२ महेंद्र शर्मा, पो.ना./२२ वैभव सातपुते, पो.कॉ./१९२७ नित्यानंद मोकल, पो.कॉ/१६७३ अमर गायकवाड यांनी केलेली आहे.